# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  १८/०८/२०२३  चे ००.०१ ते १६.०० वा.

## वाहन चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | खोलापुरी गेट पो.ठाणे<br><br>१७०/२०२३ कलम ३७९ भादवी | एकविरादेवी मंदीराजवळ खरकाडी पुरा अम | दि.१७/०८/२०२३ चे २१/००वा.ते २३/०० वा दरम्यान दाखल दि.१८/०८/२०२३ चे ११/११ वा. | मोहन लक्ष्मणराव करुले वय 48 वर्ष रा. एकविरादेवी मंदीराजवळ खरकाडी पुरा अम | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी त्यांची हिरो होंडा स्पेंन्डर मो.सा.क्र.MH-२७-AM-१३५१ इंजीन न.HAIOEFAHK९९०६७९ चेचीस नं. MBLHAl0EYAHK०६९९६ कि.अं.२०,०००/-रु.हिरो होंडा स्पेंन्डर गाडी नमुद घ.ता.वेळीव ठिकाणी फिचे घरासमोर उभी करुन ठेवली असता त्याच दिवशी रात्री २३/०० वा.सदर घटनास्थळी पाहली असता त्यांना मिळुन आली नाही.कोणीतरी   अज्ञात ईसमाने चोरुन नेली.अश्या फि.च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाग. गेट अम. अप क्र. ४११/२३ कलम ५(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९९५ सहकलम ११(१)(क) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा | लालखडी मस्जिदच्या मागे अम. | दि. १८/०८/२०२३ चे ००/२४ वा. ते ०१/३० वा.<br><br>दि. १८/०८/२०२३ चे ०२/१७ वा. | सरतर्फ पोउपनी सुशील दशरथराव कोडापे पो.स्टे. ना. गेट अम. | तारीख कुरेशी सादीक कुरेशी रा. लालखडी ना. गेट अम. | हकीकत अशा प्रकारे ` आहे `की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी दि. १७/०८/२०२३ रोजी रात्री २३/०० वा. चे सुमारास पो.स्टे. ला हजर असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, तारीख कुरेशी सादीक कुरेशी रा. लालखडी ना. गेट अम. येथे बंदीस्त जागेत गोवंश जनावरे ` कत्तली करिता घेवुन डांबुन ठेवले आहे `. अशी माहीती मिळताच आम्ही स्टेडा साना क्. ०४/२०२३ वेळ ००/२४ वा. सोबत पोलीस स्टाफ सपोनी हिवाळे सा. पोहेका २७७, नापोका ७९, १७३७ पोशी६७७, १५६७, ३५१ तसेच पंचनाम्यातील पंच व लँपटॉप व प्रिंटर सह पो.स्टे. ची फस्ट मोबाईलने लालखडी मस्जिद च्या मागे तारीख कुरेशी याच्या घरी गेलो असता त्याचे घराचे समोर एक लोखंडी गेट पलीकडे आंगन होते. तचेस आत मध्ये घराच्या आवारात गेट तयार केल्ये असुन तेथे इलेक्टीक लाईट सुरु होती त्याच्या प्रकाशात गोवंश जवानरे ` बांधलेल्या स्थितीत दिसुन आली. घराचे मुखदार बघितले असता दाराला आतुन कडी लालवल्याचे दिसुन आले. दार वाजविले असता कोणीही दरवाजा उघडला नाही. त्यामुळे घराचे मागे जावुन पाहिले असता घराच्या मागे दार असल्याचे दिसुन आले. व सदर दार उघडे ` असुन घराचे आत जावुन पाहिले असता घरातील लोक दिसुन आले नाही. घरातील लोग मागील दारातुन निघुन गेल्याचे निर्शनात आले. पुन्हा घराचे आवारातील गोठ्यात येवुन बघीतले असता पंच समक्ष सदर गोठ्याचीा पाहणी केली असता पुढील प्रमाणे गोवंश मिळुन आली. १)काळ्या रंगाची जर्शी गाय जिच्या समोरील पायावर दोरीने बाँधल्याचे काच पडलेले दिसुन आले. वय १२ कि. अ. ४०००/- रु. २) लाल भुरकट रंगाची कारोळ हिच्या पाठीवर खरचटल्याचे निशान दिसुन आले. वय ४ महिने कि.अ. २०००/- रु. ३) पांढ-या रंगाचा गोर ज्याच्या मानेवर व मागील पायावर खरचटलेल्याचे निशान दिसुन आले. वय ५ महिने कि.अं. ३०००/- रु. ४) लाल रंगाची कारोड वय ३ वर्ष कि. अं. २०००/- रु. ५) लाल पांढरी भुरकट शेपुट तुटलेली गाय, वय १२ वर्ष कि. अं. ४०००/- रु. ६) लाल रंगाचा गोर वय ३ वर्ष कि. अं. ४०००/- रु. ७) लाल रंगाची गाय ज्याच्या मागील पायावर दोरीने बांधलेल्याचे काचा पडलेल्या दिसुन आल्यया वय ७ वर्ष कि. अं. ४०००/- रु. ८) लाल रंगाची कारोड वय ४ महिने कि. अं. २०००/- रु. ९) लाल रंगाची कारोड वय ४ महिने कि. अं. २०००/- रु. असा एकुण २७०००/- रु. चा माल. जप्त करुन सदर गोवंश घटनास्थळ पंचनामा प्रमाणे जर्तत करुन वरील कलमाप्रमाणे आरोपीवर गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजापेठ मर्ग नं. ८५/२३ कलम १७४ जाफौ | प्लॉट नं.201, गिरणार अपार्टमेंट छत्रपती पगर अमरावती | नवलकुमार अनंतराम मिश्रा वय ४९ वर्ष रा.गिरणार अपार्टमेंट छत्रपती नगर अमरावती | विनोद रामलखन दुबे वय ४६ वर्ष रा दस्तुरनगर आयुर्वेदीक कॉलेजसमोर अमरावती | गळफास घेवुन आत्महत्या | दि.१८/०८/२३ रोजी मी दुकानावर ११/०० वा दरम्यान असतांना मला एक महीला हिने फोन करुन सांगीतले की,नवलकुमार ने घरके बेडरुम मे फाशी लगा ली है त्यावरुन मी माझे दुकान बंद करुन माझ ॥ साळा यांचा घरी गिरणार अपार्टमेंट छत्रपती नगर अमरावती येथे आलो असता बेडरुम मध्ये नवलकुमार याने छताचा पंखाला फाशी लावलेला लटकलेला दिसला.तेव्हा मी नवलकुमार चे पास पकडले व त्याचा मुलगा हिमांशु वय १७ वर्ष याने कैचीने गळयातील कपडा कापला त्याला खाली उतरवीले तेव्हा शेजारी लोक जमा होते.त्यांनी सुध्दा मदत केली त्याला नेण्यासाठी ॲम्बुलन्स बोलाविले असता डॉक्टरांना मरण पावल्याचे सांगीतले त्यानंतर आम्ही पोलीसांना कॉल करुन बोलाविले त्यामुळे कायदेशीर कार्यवाही करीता रिपोर्ट देत आहे हेच माझे जबानी रिपोर्टआहे ` माझा सांगणे प्रमाणे लिहला वाचुन पाहीला बरोबर आहे.अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल | पोहेका १७६९पो स्टे राजापेठ |

## जुगार रेड

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा | अप.क्र.६०७/२३ कलम ४, ५, मजुका | मॉंर्डन सोशल रिक्रियेशन क्लब लढ्ढा प्लॉट यवतमाळ टी पाईन्ट बडनेर | दि.१७.०८.२०२३ चे २१.४५ वा. ते २२.४० वा. | दि.१८.०८.२०२३ चे ००.१९ वा. | सरतर्फे सपोनि महेंद्र इंगळे क्रिमीनल इंटेलिजन्स युनिट अमरावती | १)विनोद तुळशीराम जाधव वय- ४० वर्ष रा. लढ्ढा प्लॉट यवतमाळ टी पाईन्ट बडनेरा, २) विनायक बाबनजी रुपनारायण वय- ६४ वर्ष रा. अलंकार प्लॉट नवी वस्ती बडनेरा ३) बाळकृष्ण दयारामजी पटले वय- ३२ वर्ष रा. बालाजी नगर बडनेरा अम.४) संजय देविदासजी मोहोड वय- ४० वर्ष रा. नवसारी बुध्द विहारा जवळ अम. | हककीत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी नमुद सर्व आरोपी हे बंद मॉंर्डन सोशल रिक्रियेशन क्लब च्या नावाखाली अवैधरित्या जुगाराचा पैश्याचा हारजितचा खेळ खेळत असल्याची गुप्त माहिती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता नमुद इसमांनी संस्थेच्या नावाखाली मा.धर्मदाय आयुक्त यांची परवानगी प्राप्त करुन परवानगी देते वेळी दिलेल्या सुचनांचे कुठल्याही प्रकारे पालन न करता अवैधरित्या ५२ ताश जुगाराचा पैश्याचा हारजितचा खेळ खेळतांना मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्याच्या अंगझडती मध्ये व डावावरील असे एकुण नगदी २३६०/- रु. ४ मोबाईल कि.अं.३१,०००/- रु. एक लोखंडी पेटी ज्यामध्ये जुगाराच्या हारजितच्या पैश्याचा १२ लहान मोठे हिशोबाचे रजिस्टर परवानगी कागदपत्र, सभासद पत्र, ऑंनलाईन पे.टी.एम स्टीकर, गुलाबी पोपटी हिरवा, शेंदरी, गोल्डन असे १५ क्वॉंईन ५२ ताश चे ४ पॅंकेट असा माल तसेच त्यामध्ये तंबाखु मिश्रीत वेगवेगळ्या कंपनीच्या २५ पुड्या, तसेच जुगार खेळ्या जाणारे १ लाकडी गोल टेबल, ४ प्लॉंस्टीक खुर्च्या, २ लोखंडी फोमच्या खुर्च्या असा एकुण ४३,३६०/- रु. चा माल मिळुन आल्याने सदरचा गुन्हा दाखल |